महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे,विभागीय मंडळ पुणे – ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781 / 82 / 83 | sscboardpune@gmail.com |


जा.क्र. पुविमं / शाखा एन / 3650
पुणे 411 005
दिनांक : 27 / 04 / 2026
06/05

प्रति,

सर्व मान्यता प्राप्त,
शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे, अ.नगर, सोलापूर.

विषयः– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) परीक्षेचे द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र RFP प्रकियांद्वारे ऑनलाईन प्रणालीमधून देणेबाबत...

संदर्भः– क.रा.मं. / परीक्षा–3 / 1309 दिनांक 24 / 03 / 2026

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे द्वितीय गुणपत्रक व प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र हे RFP प्रकियेद्वारे ऑनलाईन प्रणालीमधून मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरण्याबाबत पुढिल प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र तात्पुरते प्रमाणपत्र, व स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी यापूर्वीचे सर्व प्रकारचे शुल्क रद्द करण्यात आले आहे. द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्रे, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र प्रती प्रमाणपत्र रू 500 शुल्क आकारण्यात येईल.
2. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी ) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) विद्यार्थ्यांना व शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांना मोबाईल नंबर व ई–मेल ओ टी पी च्या आधारे द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र तात्पुरते प्रमाणपत्र स्थलांतर प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येईल.
3. सध्यस्थितीत 1990 सालापासून ई–मार्कशिट प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांचा सर्व data उपलब्ध आहे. त्यामुळे 1990 नंतरचे दुबार गुणपत्रक / प्रमाणपत्राची मागणी आल्यास त्याची ई–मार्कशिट ची प्रत अर्जदारास त्याच्या login मध्ये कागदपत्र सत्यता पडताळणीसाठी उपलब्ध करून दिली जाईल.
4. प्रमाणपत्राची मागणी पोस्टाने केल्यास ते स्पीड पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल.
5. प्रचलित पद्धतीमध्ये द्वितीय प्रमाणपत्रावर संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का / मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्यात येत होती. तथापि सध्यस्थितीत ऑनलाईन प्रणाली मध्ये शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारस पत्राची आवश्यकता नसल्यामुळे अर्जदारास www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याबाबत

मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच द्वितीय प्रमाणपत्रावर संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का मुख्याध्यापक/प्राचार्यांची स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही.

6. ऑनलाईन प्रणालीत एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.
7. विद्यार्थ्यांने स्वतः **login** करून आपल्या अर्जाची सध्यस्थिती मंडळाच्या संकेतस्थळावर तपासून पहावी.
8. अर्जदारांच्या अडचणीबाबत **login screen** वर हेल्प डेस्क नं (9028947883) दिलेला आहे त्यावर अर्जदारास संपर्क करण्यास सांगावे.

MBRaut

विभागीय सचिव

पुणे विभागीय मंडळ

पुणे 411005.

प्रत माहितीस्तव

1. शिक्षणाधिकारी माध्य. जि. परिषद पुणे, अ. नगर, सोलापूर
2. शिक्षण उपसंचालक, पुणे